GR-200407291510090001

# विद्यार्थ्यांच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये जात व पोटजातीचा उल्लेख करण्याबाबत

**परिपत्रक क्रमांक : पीआरई - १०९९/(२०९४)/प्राशि-१**
**दिनांक : ९ फेब्रुवारी, २०००**

परिपत्रक

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, प्राथमिक शाळेतून विद्यार्थ्यांना शाळा सोडल्याचा दाखला देताना, त्यांच्या दाखल्यामध्ये काही वेळा जात किंवा पोटजातीचा उल्लेख करण्यात येत नाही. जातीचा किंवा पोटजातीचा उल्लेख दाखल्यामध्ये नसल्यामुळे त्यांना पुढे विशेषत: मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या बाबतीत ते मागासवर्गीय संवर्गातील असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळविताना अडचणी येतात. हे लक्षात घेता असे सूचित करण्यात येते की, प्राथमिक शाळेमध्ये इयत्ता पहिलीमध्ये विद्यार्थ्यांचे नाव दाखल करुन घेताना संबंधित नोंदवहीमध्ये विद्यार्थ्यांच्या पालकांकडून विद्यार्थ्यांची जात व पोटजात विचारून घेऊन त्याची स्पष्ट नोंद करावी. प्राथमिक शाळेतून विद्यार्थ्यांनी शाळा सोडल्याचा दाखला देताना त्या दाखल्यामध्ये विद्यार्थ्यांची पालकांनी प्रवेशाच्यावेळी नोंदविलेली जात व पोटजात स्पष्टपणे नमूद करावी. मात्र विद्यार्थ्यांच्या पालकास जात किंवा पोटजात नोंदविण्याची सक्ती करण्यात येऊ नये व पालकांनी जात व पोटजात नोंदविण्यास नकार दिल्यास तशी नोंदवहीत नोंद घेण्यात यावी.

हे आदेश सर्व संबंधित शाळांच्या व अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणण्याची कार्यवाही शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी करावी.

**शा. पां. जोशी**
**सहसचिव, महाराष्ट्र शासन**